६) पियदस्सि असोकस्स थम्भलेखा

प्रस्तावना

प्रियदर्शी अशोकाचे नाव केवळ भारतातच नव्हे तर जगामध्ये मोठ्या आदराने घेतले जाते. प्रियदर्शी अशोकाचा जन्म इ.स.पूर्व ३०४ मध्ये झाला होता. त्यांचा राज्याभिषेक इ.स.पूर्व. २७० मध्ये झाला होता. अशोकाने आपल्या जीवनात कलिंगचे एकच युध्द केले. या युध्दात झालेली जीवित हानी पाहून त्यांनी यापुढे युध्द न करण्याची प्रतिज्ञा घेतली.

अशोकाने शिलालेख, गुहालेख, स्तंभलेख यांच्या माध्यमातून विविध बाबींना प्रोत्साहन दिले. स्तंभलेखाचा दुसरा व पाचवा भाग या ठिकाणी अभ्यासाला घेतलेला आहे. कोणत्याही जीवाची हिंसा करू नये याचा अंगीकार सर्व प्रजेने करावा व हे कार्य चिरकाल चालत राहावे, ही शिकवण अशोकाने टोपरा स्तंभलेख दिल्ली या स्तंभलेखाच्या माध्यमातून प्रजेला दिलेली आहे.

''व्यक्ती व प्राणी यांचे संरक्षण, कृषि व पशुसंवर्धन संरक्षण व्यवस्था करणे.''




देवानंप्पियो पियदस्सि राजा एवं आह।
धम्मं साधू, कि अयं च धम्मो? इति अनसनं बहुं अकरि।
दया, दानं, सच्चं सोचेय्य, चक्खुदानं अपि बहुविधा दिन्ना।
दुप्पादचतुप्पादेसु पक्खिवारिचरेसु विविधं मे अनुग्गहं कता, आपानं- दुक्खिणा, अञ्ञानि अपि च मया बहुनि किच्चानि अकरि।
इमं अत्थाय धम्मलिपिं लिखापिता।
इवं अनुपटिपज्जन्तु चिरट्ठितिका च होतु इति।
यो च इदं संपटिपज्जिस्सति सो सुकतं करिस्ससि।

देवानंप्पियो पियदस्सि राजा एवं आह। छब्बीसतिवस्सेन अभिसत्तेन मया इमानि जातानि अवधितुं कातुं। तं यथा सुको, सालिका, अरूणो, चक्कवाको, हसो, नंदिमुखो,

गेलाटो, जतुका, अम्बपिपिलका, दण्डी, अनट्ठिकमच्छे, वेदवेयको, गंगाकुक्कटा, सुवण्णमच्छा, कुम्मका, सलक्का, पण्णससका, सिमला, सण्डके, ओकासहिण्डे, पलासते, सेतकपोता, गामकपोता सब्बे चतुप्पदा ये पटिभोगं; न एतानि खादन्तु। एळिका, सुकरी च गब्भिनी, वा पायिता एतं अवधिन्तु। च पोतकानि अपि च एकानि अत्थि मासिको। कुक्कटं वधं न कत्तब्बो; तुसे सजीवे न झापेतब्बो, दावो अनत्थाय विहिंसा वा न झापेतेय्युं। जीवेन जीवो न पोसेय्युं। तीणि चातुमासस्स, तीणि पुण्णमिया तीणी दिवसानि चतुद्दिसं पञ्चद्दिसं पटिपज्जेय्युं धुवाय च अनपोसथ, मच्छे अवधिथ न अपि विक्किणाथ। एतानि अयं दिवसानि नागवनेसु, केवटभागेसु यानि अञ्ञानि अपि जीवानी कायानि न हनेय्य। अट्ठमीपक्खे, च चातुद्दसे, पञ्चमद्दसे तिस्से पुनब्बसु तीसु चातुमासे सुदिवसे गोणायं न लक्ख करेय्युं। अजका एळका सुकरा वा अञ्ञानि लक्खति नो लक्खय्युं। तिस्साय, पुनब्बसुनो, चातुमासे, चातुमासपक्खाय अस्सस्स वा गोणस्स लक्खं न कत्तब्बो। याव छबीसतिवस्सो अभिसित्तो मे एताय अन्तरे पञ्चवीस बंधनमोक्खनि कतानि।

(संदर्भ– असोकस्स थम्भलेखा)



शब्दार्थ

अनसनं(नपु.)– वाईट कर्मापासून दूर राहाणे.
सोचय्यं(नपु.)– सुचिता (पवित्रता)
दुप्पादचतुप्पादेसु– दोन पायांच्यामध्ये आणि चार पायांच्यामध्ये
पक्खिवारिचरेसु (पु.)– पक्षी आणि जलचर
अनुग्गहं– उपकार (अनुग्रह)
किच्चानि(नपु.)– सत्कर्म
अनुपटिपज्जन्तु (भ.)– आचरण करतील
चिरट्ठितिका (वि.)– चिरकाल टिकणारे
सकतं(वि.)– सत्कर्म
जातानि (नपु.)– जन्मलेले
अवधितुं (पूका.)– अवध्य
सुको (पु.)– पोपट
सालिका (स्त्री)– मैना
चक्कवाको (पु.)– चक्रवाक, चकवा पक्षी
हंसो (पु.)– हंस
अम्बपिपिलका (स्त्रि)– लहान मुंगी
अनट्ठिकमच्छे(पु.)– बिना हाडाचा मासा
गंगाकुक्कटा (पु.)– एक प्रकारचा कोंबडा
सुवण्णमच्छा (पु.)– सवर्णमासा
कुम्मका (पु.)– कासव
पण्णससका(स्त्रि)– पर्णशश, एकप्रकारची खार (खडुळ)
सिमला (पु.)– बारसिंघा
सण्डके (पु.)– सांड(वळू)
ओकासहिण्डे (पु.)– ओकपिंड, ओक पक्षी
पलासते (पु.)– गेंडा
सेतकपोता (पु.)– श्वेत कबुतर

पटिभोगं (नपु.)– उपयोगात येणारे
एळिका (पु.)– एडका
गब्भिनी (स्त्री.)– गर्भवती
पायिता (स्त्री.)– दूध पाजणारी
पोतक (पु.)– पिल्ले
तुसे (स्त्री.)– भुसा
न झापेतब्बो(क्रि.)– जाळल्या जाऊ नये
दावो (पु.)– जंगल
पटिपज्जेय्युं (स्त्री.)– प्रतिपदेला
केवटभागेसु (पु.)– मासेमारी करणाऱ्यांचे तळे
जिवानि कायानि (वि.)– जीव समूह
सुदिवसे (वि.)– शुभ दिवशी
लक्खं (वि.)– चिन्ह, डाग
बंधनमोक्खानि (नपु.)– बंधनातून मुक्त झालेले.

स्वाध्याय

१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणत्या राजाद्वारे धम्मलिपी लिहीली गेली आहे?
२) देवांनाप्रिय प्रियदर्शीराजाने धम्म कशाला म्हटले आहे?
३) देवांनाप्रिय पियदर्शीराजाने कोणत्या कारणाने ही धम्मलिपि लिहीली आहे?
४) देवांनाप्रिय प्रियदर्शी राजाच्या मते कोणत्या दिवशी मासे मारु नयेत व विक्री करू नयेत?
५) देवांनाप्रिय प्रियदर्शी राजाने किती वेळा कैद्यांची कैदेतून सुटका केली

२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) दुप्पादचतुप्पादेसु पक्खिवारिचरेसु विविधं मे अनुग्गहं अकता।
२) यो च इदं संपटिपज्जिस्सति सो सुकतं करिस्ससि।
३) छब्बीसतिवस्सेन अभिसित्तेन मया इमानि जातानि वधितुं कातुं।
४) जीवेन जीवो पोसेय्युं।
५) नागवनेसु, केवटभागेसु यानि अञ्ञानि अपि जीवानि कायानि न हनेय्य।
६) सब्बे चतुप्पदा ये पटिभोगं, न एतानि खादन्तु।

३. रूपे ओळखा.

१) अवधिथ　　२) संपटिपज्जिसति
३) अकरि

४. नकारार्थी वाक्य तयार करा.

१) एळिका, सुकरि च गब्भिनी वा पायिता एतं वधिन्तु।
२) अजका, एळका, सुकरा वा अञ्ञानि लक्खति लक्खेय्युं।

५. होकारार्थी वाक्य तयार करा.

१) दया, दानं, सच्चं, सोचय्यं, चक्खुदानं अपि बहुविधा अदिन्ना।


६. संधी करा.

१) एवं+आह
२) सो + अपि
३) गोण + आयं

७. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.

१) धम्मं साधु, किं अयं च.....?।
(धम्मो/धम्मं)
२) तिस्साय, पुनब्बसुनो, चातुमासे, चातुमासपक्खाय अस्सस्स वा गोणस्स लक्खं.....।
(कत्तब्बो/न कत्तब्बो)

८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.



९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.

प्रियदर्शी अशोकाच्या दुसऱ्या व पाचव्या स्तंभलेखाची माहिती लिहा.